26-02-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/25/2025 11:13 PM Page 1

निवडक

महालक्ष्मी सांस्कृतिक मंडळ नेत्रावळीतर्फे आजपासून महाशिवरात्री उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

सांगे, दि. २५ : महालक्ष्मी सांस्कृतिक मंडळ नेत्रावळीतर्फे बुधवार दि. २६ ते शुक्रवार दि. २८ दरम्यान महाशिवरात्री उत्सव साजरा होणार आहे. २६ रोजी श्री महालक्ष्मी मंदिराच्या रंगमंचावर पारंपारिक गणेशवंदना गुरुवार दि. २७ रोजी दुपारी १२ वाजता सार्वजनिक सत्यनारायण महापूजा तद्नंतर आरती, तीर्थप्रसाद, रात्री ८.३० वाजता गुंफा देवस्थानातील श्री दत्त महाराजांचे वाजत गाजत पालखीतून महालक्ष्मी मंदिरात आगमन होईल. व त्यानंतर रात्री १०.३० वाजता महालक्ष्मी सांस्कृतिक मंडळ नेत्रावळी व कला संस्कृती संचालनालय, गोवा यांच्या विद्यमाने राम राम गंगाराम हा कोकणी नाट्यप्रयोग सादर होईल. या नाटकाचे लेखक लक्ष्मीकांत साळगावकर आहेत तर अनिल पांडुरंग नाईक यांना दिग्दर्शन केले आहे. शुक्रवार दि. २८ रोजी रात्री १०.३० वाजता नेत्रावळी पंचायतीचे उपसरपंच फ्रान्सिस उर्फ आयेतीन मास्कारेन्स पुरस्कृत, नागेश महारुद्र नाट्य संस्था नागेशी निर्मित व प्रशांत सतरकर लिखित दक्षा शिरोडकर यांनी दिग्दर्शित केलेले बाबू हे नाटक सादर होईल.

पानवेल रायबंदर येथे उद्यापासून नाट्य उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २५ : पानवेलकर नाट्यसेवा संघाचा माघ महिन्यातील नाट्य उत्सव गुरुवार दि. २७ पासून, पानवेल रायबंदर येथील श्री विठ्ठल मंदिरात साजरा होणार आहे. त्यानिमित्त गुरुवार दि. २७ रोजी संध्याकाळी ७ वाजता शुभम सुरेश कुंडईकर यांच्या यजमानपदाखाली सत्यनारायण महापूजा, रात्री ८ वाजता भजन त्यानंतर फळफुलांची पावणी, आरती, तीर्थप्रसाद होईल. शुक्रवार दि. २८ रोजी रात्री ९.३० वाजता कालाय तस्मै नः हा नाट्यप्रयोग सादर होईल. त्याचे संगीत सुधीरकुमार सूर्लकर यांनी दिले आहे व यात महेंद्र बांदोडकर, संतोष बांदोडकर, संदिप गणपत नाईक, दामोदर कमलाकांत नाईक, परेश बांदोडकर, रिया रुपेश देसाई, आर्या साईश आमोणकर, साईच्छा गणपत पेडणेकर यांच्या भूमिका आहेत. शनिवार दि. १ मार्च रोजी रात्री ९.३० वाजता भालचंद्र उसगावकर यांचे जय शिवराय हे नाटक सादर होईल. यात गोविंद गावडे, भालचंद्र उसगावकर, हनुमंत आजगावकर, दादू पार्सेकर, रुपेश शिरगावकर, हरिष अडकोणकर आदींच्या प्रमुख भूमिका आहेत.

मांद्रे नवनाथ मठाचा २ मार्चला वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २५ : मांद्रे आस्कावाडा येथील श्री दत्तराज नवनाथ मठाचा वर्धापन दिन सोहळा रविवार दि. २ मार्च रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. या दिनी सकाळच्या सत्रात धार्मिक विधी, गणेश पूजन, श्री दत्तात्रेय मूर्ती महाअभिषेक, लघुरुद्र तसेच श्री देव नवनाथ अलंकार भूषण, यजमान सौ. व श्री . महेश जनार्दन कोनाडकर यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर आरती व महाप्रसाद तसेच संध्याकाळी स्थानिक भजनी कलाकारांचा भजन कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व भाविक भक्तांने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे नवनाथ मठाचे सुखानंद स्वामी उर्फ पुर्खे महाराज यांनी आव्हान केले आहे.

श्रीसुशेण दत्त मठ हातुर्ली येथे आज महाशिवरात्री उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

हातुर्ली, दि. २५ : परमपूज्य पद्मनाभ शिष्य संप्रदाय – पीठाधीश्वर, पद्मश्री सद्गुरू ब्रह्मेशानंदाचार्य स्वामीजींच्या पावन सान्निध्यात श्री सुशेण दत्त मठ, हातुर्ली येथे बुधवार दि. २६ रोजी महाशिवरात्री उत्सव होणार आहे. महाशिवरात्रीच्या सणाचे महत्त्व विशेष आहे कारण ही शिव आणि शक्तीच्या मिलनाची रात्र आहे. या दिवशी सर्व शिवमंदिरांमध्ये भगवान शिव शंकराचा रुद्राभिषेक करतात आणि सर्व शिव भक्त या दिवशी उपवास करतात. समुद्र मंथनातून निघालेले हलाहल विष याच दिवशी शंकरांनी प्राशन केले होते आणि जगाला विनाशापासून वाचवले हेच ऋण फेडण्याचा दिवस म्हणजे महाशिवरात्री होय. सकाळच्या सत्रात तपोभूमी वैदिक शिष्यांद्वारे श्रीशिवयाग, पूज्य सद्गुरु पूजन तथा रुद्राभिषेक संपन्न होणार आहे. भाविकांकडून षडाक्षरी मंत्र जप होणार आहेत. त्यानंतर आरती, दर्शन व महाप्रसादाने सकाळच्या सत्राची सांगता होईल.संध्याकाळच्या सत्रात हातुर्ली मठात स्वामी सदानंद संगीत संस्थेच्या कलाकारांद्वरे भजन संपन्न होईल तसेच यजमानांकडून पालखी पूजन होईल. व त्यानंतर धुपारती, प्रार्थना व सद्गुरु गजरात, टाळ–मृदुंगाच्या तालात पालखी उत्सव, पूज्य स्वामीजींचे दिव्य आशीर्वचन, महाआरती, दर्शन व महाप्रसादाने या उत्सवाची सांगता होईल. या उत्सवाला समस्त हिंदूधर्मियांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पूज्य सद्गुरु आशीर्वचन तथा दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन परमपूज्य पद्मनाभ शिष्य संप्रदायाद्वारे करण्यात आले आहे.

मल्लिकार्जुन देवस्थानात आज महाशिवरात्रोत्सव

– उद्या २७ रोजी श्रींचा समुद्रस्नान सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. २५ : काणकोण, श्रीस्थळ येथील श्री मल्लिकार्जुन देव अडवट सिंहासनाधीश्वर महापती श्री मल्लिकार्जुन देवस्थानात बुधवार दि. २६ रोजी, महाशिवरात्रोत्सव व दि. २७ रोजी, देवावेळ याठिकाणी श्रींचे समुद्रस्नान होईल. महाशिवरात्री प्रित्यर्थ देवस्थानात सकाळी ८ वाजता श्रींस महाजन, कुळावी, ग्रामस्थ व भक्तगणांकडून अभिषेक सेवा प्रारंभ होईल. दुपारी १ वा. महाभिषेक, महाआरती व महाप्रसाद होईल. रात्री ८ वाजता श्रींची अंबारी रथातून मिरवणूक काढण्यात येईल. त्यानंतर देवस्थानात श्रींची पूजा, आरती व महाप्रसाद असेल.

गुरुवार दि. २७ रोजी, पहाटे ५वाजता मंदिराकडून श्रींच्या नुतन उत्सव मूर्तीचे पालखीतून, पारंपारिक वाद्यघोषासह समुद्रस्नानासाठी प्रयाण होईल. यावेळी काही पारंपरिक ठिकाणी तोरणे, सजावट केली जाते. सकाळी ७ वाजता राजबाग, तारीर येथील देवावेळ समुद्र किनाऱ्यावर श्रींचे आगमन होईल. भाविक मोठ्या संख्येने याठिकाणी उपस्थित राहून श्रींचे समुद्रस्नान मंत्रघोषात संपन्न झाल्यावर समुद्राला केळी अर्पण करून श्रींचे दर्शन घेतात. समुद्र स्नान करून ब्राह्मणाला दान देतात. श्रींचे समुद्रस्नान आटोपल्यावर सकाळी ९ वा. श्रींचा मुख्यदेवस्थानात परतीचा परतीचा प्रवास सुरू होईल. सर्व भक्तगणांनी उपस्थित राहून श्रींचे आशीर्वाद घ्यावेत, असे देवस्थान समितीतर्फे करण्यात आले आहे.

याठिकाणी या निमित्ताने जत्रा भरते. विविध प्रकारच्या दुकानांनी किनारा गजबजतो. अनेक भागातून लोक लवकरच सुरू होणार असलेल्या शिमगोत्सवा निमित्त सामान खरेदी करताना दिसून येतात. लोकांनी विक्री करता आणलेले सामान दुपार पर्यंत संपवून घरी परतीच्या मार्गाला लागतात.

पावसामुळे ऑस्ट्रेलिया-द. आफ्रिका सामना रद्द

दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण मिळाला; 'ब' गटात गुंतागुंत वाढली

रावळपिंड, दि. २५ :

चॅम्पियन्स ट्रॉफीतील सेमीफायनलच्या दृष्टीने महत्त्वाचा सामना ऑस्ट्रेलिया वि. दक्षिण आफ्रिका पावसामुळे रद्द झाला आहे. रावळपिंडीमध्ये हा सामना खेळवला जात होता, पण सुरुवातीपासूनच पावसाने जोरदार हजेरी लावली आणि नाणेफेक न होताच सामना रद्द करण्यात आला. हा सामना रद्द झाल्याने दोन्ही संघांना एकेक गुण देण्यात आला आहे. पण याचा गुणतालिकेवर काय परिणाम होणार, जाणून घेऊया.

ऑस्ट्रेलिया–दक्षिण आफ्रिकेचा सामना रद्द झाल्याने आता ब गटातील लढत अधिक चुरशीची झाली आहे. इंग्लंड आणि अफगाणिस्तान यांच्यातील सामना आता खूप महत्त्वाचा असणार आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीतील ब गटाच्या गुणतालिकेत दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया दोन्ही संघ समान ३ गुणांवर आहेत.

ऑस्ट्रेलियाने इंग्लंडविरुद्धचा पहिला सामना ५ विकेट्सने आणि १५ चेंडू शिल्लक ठेवत जिंकला. तर दक्षिण आफ्रिकेने अफगाणिस्तानविरुद्धचा पहिला सामना १०७ धावांच्या मोठ्या फरकाने जिंकला. यासह नेट रन रेटमध्ये दक्षिण आफ्रिकेचा संघ वरचढ आहे. दोन्ही संघ गुणांवर बरोबरीत असूनही, दक्षिण आफ्रिका ऑस्ट्रेलियाच्या तुलनेत जास्त रन रेटसह पहिल्या स्थानी असेल. दक्षिण आफ्रिकेचा रन रेट हा +२.१४० आहे , तर ऑस्ट्रेलियाचा रन रेट +०.४७५ आहे.

इंग्लंड आणि अफगाणिस्तानच्या संघांना त्यांचे पुढील दोन्ही सामने जिंकत सेमीफायनलमध्ये जाण्याची संधी असणार आहे. आता दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांचा एकेक सामना शिल्लक आहे. त्यामुळे या चारही संघांचे सर्व सामने जोपर्यंत पूर्ण होत नाहीत. तोवर सेमीफायनलचे तिकीट कोणाला मिळणार याबाबत निश्चितता नाही. पण नेट रन रेट पाहता दक्षिण आफ्रिकेने त्यांचा पुढचा सामना जिंकल्यास त्यांना सेमीफायनल गाठता येईल.

तर चॅम्पियन्स ट्रॉफीत ऑस्ट्रेलियाचं नशीब खराब असल्याचं दिसत आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या आठ सीझनमध्ये सहभागी होणाऱ्या ऑस्ट्रेलिया संघाला चौथ्यांदा पावसामुळे सामना अनिर्णित सुटण्याचा आणि रद्द होण्याचा धक्का बसला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीतील ही चौथी वेळ जेव्हा ऑस्ट्रेलिया संघाचा सामना रद्द झाला आहे.

'व्हिजन प्रीमियम लिग–२०२५'चा व्हिजन स्ट्रायकर्स विजेता

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. २५ : साळ येथे सरकारी हायस्कूलच्या मैदानावर खेळविण्यात आलेल्या 'व्हिजन प्रीमियर लीग – २०२५'च्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेमध्ये व्हिजन स्ट्राइकर्सने विजेतेपद पटकावले.

सदर स्पर्धा व्हिजन हॉस्पिटल – म्हापसाने आयोजित केली होती. यामध्ये व्हिजन वॉरिअस, व्हिजन होल्डिंगस, व्हिजन स्ट्रायकर्स, आय. एम. ए. बार्देश या चार संघांमध्ये स्पर्धा खेळविण्यात आली.

अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीस उतरलेल्या व्हिजन स्ट्राइकर्सने सहा षटकात पाच गड्याच्या मोबदल्यात ६१ धावा केल्या तर उत्तरादाखल उतरलेल्या व्हिजन वॉरिअसने धावाचा पाठलाग करताना सहा षटकात ५९ धावा केल्या करता आल्या तर दोन धावांनी त्यांना हा हार पत्करावी लागली.

सामनावीर व उत्कृष्ट फलंदाज – रतिश परब (स्ट्रायकर्स) ला दुहेरी मुकुट, उत्कृष्ट फलंदाज – प्रवीण सावंत, मालिका वीर – जितेश , उत्कृष्ट संघ – व्हिजन स्ट्रायकर्स, उत्कृष्ट झेल – अनिश यांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित केले तसेच या स्पर्धेत पंच म्हणून आसिफ शेख, प्रताप गावकर व प्रसाद शिरगावकर यांनी काम पाहिले. स्पर्धेचे धावते समालोचन अशोक नाईक (वेंगुर्ला), मंथन परब (वेंगुर्ला) यांनी केले, गुणफलक – दीप्ती घुरे, गंगेश (नाना) राऊत तर युट्युब प्रसारण रजत व सुयश यांनी काम पाहिले. मैदानावर जखमी खेळाडूना प्रथमोपचार देण्याची कामगिरी सुनिता देसाई पळ व साथीनी उत्तमपणे साभाळली.

बक्षीस वितरण कार्यक्रमास आमदार डॉ. चंद्रकांत शेटये पोलीस निरीक्षक (गुन्हा अन्वेषण) दत्ताराम राऊत , पत्रकार – दिलीप देसाई, जयवंत राऊत,शांबा घुरे, वसंत राऊत, गौरेश राऊत आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांचे हस्ते विजेत्यांना चषक प्रदान करण्यात आला तर स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमास साबाजी शेट्ये , पोलीस निरीक्षक निनाद देऊलकर पोलिस, पोलिस निरीक्षक दत्ताराम राऊत, श्री महादेव भूमिका देवस्थान – साळ अध्यक्ष कालिदास राऊत, सचिव – विशाल परब आदी मान्यवर उपस्थित होत .

लोककलाकारांनी स्मरणशक्तीच्या जोरावर टिकवली गावनकाणी

संजय गावकर : गोवा विद्यापीठाकडून काणकोणात ग्रामिण शिबिराचा समारोप

■ टीम दैनिक हेराल्ड

काणकोण : गोवा विद्यापीठाच्या समाजकार्य विभागाच्या विद्यार्थ्यांसमवेत संजय गावकर, बाबू वेळीप, डॉ. गणेशा सोमय्या, केवल नाईक व प्राची प्रभू.

आगोंद, दि. २५ : 'गावनकाणी' हा आदिवासी लोककलेच्या विविध प्रकारांपैकी एक असून तो सर्वात समृद्ध आणि प्रभावी असा प्रकार आहे. गावनकाणी ही बळीकुंवर, रामायण, महाभारत, पांडवप्रताप, शारदाकथा अशा अनेक महाकाव्यांवर आधारलेली आहे. उत्सव प्रसंगी रात्रभर गायला जाणारा हा प्रकार उपस्थितांना खिळवून ठेवतानाच त्यात असलेले भाषिक सौंदर्य विस्मयचकित करते. आपल्या अद्भुत स्मरणशक्तीच्या जोरावर ज्येष्ठ लोककलाकारांनी सांभाळून ठेवलेला दुर्मिळ असा हा प्रकार आज शेवटच्या घटका मोजत असून त्याच्या संवर्धनाची गरज आहे, असे प्रतिपादन आदिवासी साहित्याचे अभ्यासक संजय गावकर यांनी केले.

गोवा विद्यापीठाच्या समाजकार्य विभागातर्फे चार रस्ता, काणकोण येथील आसरा घरात ग्रामिण शिबिराच्या समारोप प्रसंगी आज रोजी, आयोजित 'गावन काणी' व्याख्यानात ते खास अतिथी म्हणून बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर समाजकार्य विभागाचे प्रमुख डॉ. गणेशा सोमय्या, लोककलाकार बाबू वेळीप, साहा. प्राध्यापक केवल नाईक, कार्यक्रम अधिकारी प्राची प्रभू उपस्थित होत्या. श्री. गावकर यांनी गावनकाणीतील काही प्रसंग कथन केले. सुरवातीला विद्यार्थ्यांनी दहा दिवशीय शिबिराचे अनुभव कथन केले. प्रा. नाईक यांनी स्वागत, डॉ. सोमय्या यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सोमय्या यांनी बाबू वेळीप यांचा सन्मान चिन्ह देऊन गौरव केला. शेवटी बाबू वेळीप यांनी अतिशय तन्मयतेने गावनकाणी सादर केली.

शिवरात्रोत्सवानिमित्त कारापूर येथे आज भरगच्च कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. २५ : वर्ष पद्धतीप्रमाणे कारापूर साखळी येथील श्री महादेव देवस्थानात शिवरात्रोत्सवानिमित्त यंदा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्त बुधवार २६ रोजी शिवरात्रोत्सवा दिनी सकाळपासून भक्तांसाठी मुक्तद्वार व अभिषेक होईल. त्यानंतर मंदिरात धार्मिक विधी. दुपारी सार्वजनिक लघुरुद्र व नंतर भजनाचा कार्यक्रम व संध्याकाळी ६.३० ते ८.३० वाजता स्थानिक महिलातर्फे हरीपाठ होईल. रात्री ९ वाजतामहाप्रसादाचा कार्यक्रम होईल. सर्व भक्तांनी आवर्जून उपस्थित राहावे अशी विनंती श्री महादेव संस्थानातर्फे करण्यात आली आहे.

शास्त्रीय संगीतामुळे मन:शांती मिळते

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत : कै. धोंडू भिकू नाईक स्मृती समारोहाचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी : येथे कै. धोंडू भिकू नाईक स्मृती संगीत समारोहाचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत नरेश दातये, रामचंद्र नाईक, संतोष मळीक व इतर.

साखळी, दि. २५ : शास्त्रीय संगीतामुळे माणसाला मन:शांती लाभते व बुद्धीत वाढ होते, असे उदगार मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी काढले. हरवळे साखळी येथील राधाकृष्ण संगीत अकादमी व कला आणि संस्कृती संचालनालय गोवा सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने तेराव्या कै. धोंडू भिकू नाईक स्मृती समारोहाच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.यावेळी त्यांनी आयोजकांचे आणि या समारोहाला सहकार्य केलेल्यांचे अभिनंदन केले.

संगीत समारोहाचे उद्घाटन डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते समई प्रज्वलित करून करण्यात आले. यावेळी त्यांच्यासोबत व्यासपीठावर हरवळे ग्रामपंचायतीच्या संरपंच सौ.गौरवी गुरुप्रसाद नाईक,उद्योजक शिवदास गावस,महालक्ष्मी फार्मसीचे मालक चंद्रकांत नारुलकर,कामाक्षी हार्डवेयरचे मालक रितेश नाईक, समाज सेवक नरेश दातये, अकादमीचे अध्यक्ष प्रा. संतोष मळीक,सचीव दत्ताराम माडकर,कोषाध्यक्ष अनील जल्मी, संस्थापक रामचंद्र धोंडू नाईक, समारोह प्रमुख राज मडगावकर, शाम फातर्पेकर आदी उपस्थित होते. यावेळी राधाकृष्ण संगीत अकादमीच्या विद्यार्थ्यांनी इशस्तवन सादर केले. त्यांना हार्मोनियमवर स्मितल मळीक व तबल्यावर वृषांग माडकर यांनी साथ केली. सदर उद्घाटन सोहळ्याला उपस्थित मान्यवरांचे आभार अकादमीचे अध्यक्ष प्रा. संतोष मळीक यांनी मानले.

सकाळच्या सत्रामध्ये गुरुदास गावकर यांचे गायन झाले. त्यांनी राग अल्हैया बिलावल सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यांना हामोनियम साथ अमोल गावस व तबला साथ गोविंद गावस यांनी दिली. तानपुरा साथ अरुणदत्त परब व अनिकेत नाईक यांनी केली. त्यानंतर गोव्यातील नामांकीत तबला वादक अमर मोपकर यांचे तबला वादन झाले. त्यांना नगमा साथ उपेंद्र साळगावकर यांनी केली. नंतर पं. चंद्रकात नाईक यांचे गायन झाले. त्यांनी सुरुवातीला राग नटसारंग हा अप्रचलीत राग सादर केला त्यानंतर त्यांनी राग देव गंधार सादर केला आणि शेवटी मौनात पाखरांचे वनगीत शोधिताना हे नाट्यगीत गाऊन आपल्या गाण्याची सांगता केली. त्यांना हार्मोनियम साथ सुभाष फातर्पेकर व तबला साथ पं. तुळशिदास नावेलकर यांनी केली.तानपुरा साथ गुरूदास गावकर, दिव्या गावडे यांनी केली.

संध्याकाळच्या संत्रामध्ये अनुजा व अनुष्का रामचंद्र नाईक या भगिनींचे सहगायन झाले त्यांनी राग मधुवंतीमध्ये बड़ा ख्याल,छोटा ख्याल व तराणा सादर केला. त्यांना हार्मोनियम साथ अमोल गावस व तबला साथ वासुदेव च्यारी यांनी केली. त्यानंतर दिगंबर गावस यांचे संवादिनी एकल वादन झाले.त्यांनी राग भीमपलास सादर केला व घेई छंद मकरंद हे नाट्यगीत वाजवले.त्यांना तबला साथ गौरव गावस यांनी केली. त्यानंतर पुणे येथील रामेश्वर डांगे यांचे गायन झाले त्यांनी राग मुलतानी सादर केला व शेवटी भजन सादर केले. त्यांना हार्मोनियम साथ चांगदेव नाईक व तबला साथ संकेत खलप यांनी केली. तानपुरा साथ केवल नाईक व महेश गावडे यांनी केली.यानंतर गोमंतकीय कन्या पुणे येथे स्थायिक कु.स्वानंदी चंद्रकांत नाईक यांचे गायन झाले त्यांनी राग धानी सादर केला व भासे जनात राया हे नाट्यगीत गाऊन श्रोत्यांकडून वाहव्वा मिळवली.त्यांना हार्मोनियम साथ कार्तिक च्यारी व तबला साथ मिलिंद परब यांनी केली.तानपुरा साथ अनुजा नाईक व अनुष्का नाईक यांनी केली.

शेवटच्या सत्रात पं. सुधाकर देवळे यांच्या गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.त यांनी आपल्या गायनाला राग प्रताप बरलिने सुरुवात केली व नंतर राग बसंती केदार सादर केला.शेवटी सर्वात्मका सर्वेश्वरा ही भैरवी सादर केली. त्यांना त्यांच्या कन्या कु.रागिणी देवळे यांनी गायन साथ केली. हामोनियम साथ दत्तराज म्हाळशी व तबला साथ पं.अविनाश पाटील यांनी केली.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय सालेलकर यांनी केले. ध्वनी संकलन राज मडगावकर यांची होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अकादमीचे विद्यार्थी, पालक आणि प्रायोजक यांचे फार मोठे सहकार्य लाभले. तसेच शिवानंद खेडेकर यांचंही मोलाचे सहकार्य लाभले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १७४ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 174 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .